३५०

(७)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉईंट, मुंबई -२१

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/७९५/ ८३२  २८ ऑगस्ट, २०१५

परिपत्रक क्र. १६२

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा तसेच पूर्ण ठेव तत्वावरील कामे शासन नियमानुसार देय असलेले सेवा शुल्क प्राप्त झाल्याशिवाय न करणेबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र.सुनिअ-२०१०/प्र.क्र.५१०/पापु-२२, दि.२२.२.२०११

विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच इतर शासकीय व बिगर शासकीय संस्था यांच्या मालकीच्या प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा तसेच पूर्ण ठेव तत्वावरील कामांपोटी मजीप्राला देय असलेल्या सेवा शुल्काबाबत मार्गदर्शक सूचना दि. २२ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आल्या आहेत.

तसेच मजीप्रामार्फत पूर्ण ठेव तत्वावर हाती घेण्यात येणाऱ्या कामांसाठी आकारावयाच्या ई ॲन्ड पी. शुल्काबाबतही तसेच शासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत मजीप्रामार्फत कामे हाती घेताना आकारावयाच्या शुल्काबाबतही वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. मजीप्रामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा अंतर्गत कामांशिवाय विविध कार्यक्रमांतर्गत पूर्ण ठेव तत्वावर हाती घेण्यात येतात.

बऱ्याच प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, मजीप्रामार्फत करण्यात येत असलेल्या कामांपोटी ई ॲन्ड पी शुल्क मजीप्रास संबंधित संस्थांकडून अदा केले जात नाही. प्रकल्प सेवा सल्लागार शुल्क वा ई. ॲन्ड पी. शुल्क प्राप्त झाल्याशिवाय कामे हाती घेऊ नयेत, असे या कार्यालयाकडून अनेक वेळा निर्देश देण्यात येऊन सुध्दा बऱ्याच ठिकाणी आवश्यक शुल्क प्राप्त करुन न घेता कामे करण्यात येत आहेत. अशा प्रकारे क्षेत्रीय कार्यालयामार्फत मजीप्राच्या संचालक मंडळाने ई ॲन्ड पी विषयी घेतलेल्या निर्णयाचे उल्लंघन होत आहे. त्यामुळे मजीप्राच्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित परिपत्रकामधील तरतुदींचे/सुचनांचे सर्व क्षेत्रीय कार्यालयानी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. पूर्ण ठेव तत्वावर तसेच प्रकल्प सेवा सल्लागार म्हणून करण्यात येणाऱ्या कामासाठी विहित शुल्क प्राप्त करणे ही संबंधित क्षेत्रीय कार्यालयांची जबाबदारी आहे.

सर्व मुख्य अभियंता यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील उक्त कामांचा नियमितपणे आढावा घ्यावा. त्यामध्ये विषयंकित सर्व कामांचा सविस्तर तपशील, त्या कामांच्या अनुषंगाने अनुज्ञेय ई. ॲन्ड पी. / प्र.स.से. शुल्क, त्यापैकी प्राप्त शुल्क, प्राप्त होण्याचे बाकी शुल्क, प्रलंबित शुल्काची कारणे, शुल्क वसूल करण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न, शुल्क कामासाठी अनुज्ञेय करण्यात आले नसल्यास त्याची कारणे, त्यास जबाबदार अधिकाऱ्यांची नावे, अशा प्रकारच्या शुल्कांची एकूण रक्कम इ. सर्व माहितीचा समावेश

असावा. मासिक आढावा बैठकीमध्ये त्याबाबतच्या विषयाचा समावेश असावा. ई. ॲन्ड पी. व प्र.स.से. शुल्क वेळच्या वेळी प्राप्त करुन मजीप्राचा महसूल वाढविण्याचा प्रयत्न करावा.

तरतूद नसेल अथवा ज्या कामांना ई. ॲन्ड पी. शुल्क अथवा प्र.स.से. शुल्क प्राप्त होत नसेल अशी कामे हाती घेऊ नये. सदर परिपत्रकातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास, संबंधित अधिकारी, म.ना.से. (शिस्त व अपील) अंतर्गत प्रशासकीय कार्यवाहीस पात्र ठरतील व तशी कारवाई करण्यात येईल.

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

प्रतः मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

प्रतः स्वीय सहाय्यक, मा.मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : संचालक वित्त, मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी.
सदर बाबीचे आपल्या स्तरावरुन संनियंत्रण करण्यात यावे.

प्रत : संचालक तांत्रिक, मजीप्रा, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : सर्व मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.